# गुरूभक्ती

मानसपुजा स्वामी माझी
स्विकारावी गुरूदत्ता, गुरूराया
स्विकारावी गुरूदत्ता ॥
अंतरीची भक्ती चैतन्याची दिव्यमुर्ती
दयाक्षमारूपे, उजळती ज्योती ॥
ध्यानी मनी स्वप्नी, भजनी किर्तनी
सदा माझे मुखी, नाम तुझे राही ॥
सुख, शांती दीप, तूच योगिराज
उमगले सत्य, माझीया मनास ॥
नामजप करता, मन शांत होई
प्रगटले ब्रह्म, दयाघना गुरूदत्ता ॥



सौ. प्रिती लकडे
औंध पुणे